
# कलेचा इतिहास व रसग्रहण

## इयत्ता बारावी



# भारताचे संविधान

**भाग ४ क**

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्‌दल दयाबुद्‌धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३१.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# कलेचा इतिहास व रसग्रहण

## इयत्ता बारावी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

M4C9S3

आपल्या स्मार्टफोनवर DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**कलेचा इतिहास व रसग्रहण अभ्यासगट**

डॉ. शिरीष आंबेकर
श्री. जगदीश पाटील
श्री. विलास गोपाळे
श्री. सूर्यकांत जाधव
डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य सचिव)

**अक्षरजुळवणी**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व अंतर्गत चित्राकृती**
श्री. सूर्यकांत जाधव
श्रीमती भारती हिंगणे
श्री. विलास गोपाळे
श्रीमती मयुरा डफळ
श्री. अभिजीत धोत्रे

**निर्मिती**
श्री. सच्चिदानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. संदीप आजगावकर,
निर्मिती अधिकारी

**कागद**
७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**प्रमुख संयोजक**
**डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी, कला शिक्षण,
प्र. विशेषाधिकारी, आरोग्य व शारीरिक शिक्षण,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

इयत्ता बारावीच्या वर्गात तुम्हां सर्वांचे स्वागत. 'कलेचा इतिहास व रसग्रहण' या विषयाचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे.

दैनंदिन जीवनात कला या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कलेची विविध अंगे आत्मसात करता करताच कलेच्या इतिहासाचाही परिचय व्हावा, हा या पाठ्यपुस्तक निर्मितीमागील हेतू आहे. या पुस्तिकेत मूलभूत अभ्यासक्रमाच्या रूपरेषेनुसार भारतीय व पाश्चात्य कलेच्या इतिहासाची ओळख व्हावी आणि कला इतिहासाच्या अभ्यासाचे क्षेत्रही स्पष्ट व्हावे, ह्या दृष्टीने सैद्धांतिक व प्रात्यक्षिक अशा दोन विभागांत अभ्यासक्रमाची मांडणी करण्यात आलेली आहे.

पाठाखालील स्वाध्यायाचे स्वरूप आणि रचना वैविध्य हे या पाठ्यपुस्तकाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य आहे. स्वाध्याय तुम्हांला पाठाचे अंतरंग समजून घेण्यास मदत करतील. तुमच्यातील कल्पकता, सर्जनशीलता, विचारशक्ती आणि आकलनशक्ती विकसित करण्यासाठी हे स्वाध्याय निश्चितच उपयुक्त ठरतील. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तुमचा सातत्यपूर्ण सराव यातून तुम्हांला सहज अभ्यास करता येईल.

अध्ययन प्रक्रिया आनंददायी होण्यासाठी क्यू. आर. कोडद्वारे दृकश्राव्य माहिती आपणास उपलब्ध होईल. या विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावीपणे, सहजतेने व आनंदाने व्हावे या दृष्टीने हे पाठ्यपुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल. यापूर्वी कलेचा इतिहास व रसग्रहण या विषयाची शिक्षक हस्तपुस्तिका तयार करण्यात येत असे परंतु यावर्षी प्रथमच 'कलेचा इतिहास व रसग्रहण' या विषयासाठी पाठ्यपुस्तक तयार केले आहे. या पाठ्यपुस्तकात प्रात्यक्षिक विषयांचाही समावेश केलेला आहे. मुख्याध्यापक, पालक, विद्यार्थी तसेच या विषयाचे जाणकार या सर्वांकडून विद्यार्थ्यांसाठी प्रथमच तयार केलेल्या या चार रंगी पाठ्यपुस्तकाचे स्वागतच होईल अशी आशा आहे.

पाठ्यपुस्तक वापरताना काही शंका वा अडचणी आल्यास त्या मंडळाला जरूर कळवाव्यात. तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा!

(विवेक उत्तम गोसावी)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

## शिक्षकांसाठी

विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचा विकास करून त्यांच्या जास्तीत जास्त क्षमता उपयोगात आणणे अपेक्षित आहे. या विकास प्रक्रियेत व उपाययोजनांमध्ये आपला फार मोठा वाटा आहे. हा विषय अभ्यासण्यासाठी दोन भागांत विभागण्यात आला आहे.

**अ) सैद्धांतिक विभाग :**

भारतीय व पाश्चात्य कला इतिहासातील चित्रकला, शिल्पकला व वास्तुकला यांविषयीची चित्रमय माहिती अतिशय सोप्या भाषेत देण्यात आलेली आहे. हा भाग **अनिवार्य** आहे. कलाकृतींच्या रसग्रहणासाठी–
**वास्तू** – सूर्य मंदिर,कैलास मंदिर, कुतुब मिनार, ताजमहाल. **शिल्प**– गंगावतरण, त्रिमूर्ती, स्टॅच्यू ऑफ युनिटी, पिएत्ता
**चित्र–** मोनालिसा, तारांकित रात्र (स्टारी नाईट) रात्रीचा पहारा (नाईट वॉच) सैरंध्री इत्यादी.

**ब) प्रात्यक्षिक विभाग :**

चित्रकला, संकल्पचित्र व चित्रात्मक संकल्पाविषयीची चित्र, आकृत्या, फोटो याद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रात्यक्षिकांपैकी **कोणताही एक प्रात्यक्षिक विषय** विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार घेता येईल. पुस्तकात शेवटी दिलेली चित्रे ही विद्यार्थ्यांची आहेत. प्रात्यक्षिक कार्य करताना/देताना उपलब्ध साधन सुविधा विचारात घेऊन प्रात्यक्षिक कार्याचे नियोजन करणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी बदल करण्यास हरकत नाही. वर्षभरात केलेल्या वर्गकामांतील एक प्रात्यक्षिक काम वार्षिक परीक्षेत असणे अपेक्षित आहे. संपूर्ण वार्षिक कामाला वर्षाअखेर गुण द्यावेत व या अंतर्गत मुल्यमापनाची नोंद ठेवावी. सदर प्रात्यक्षिक कार्य हे विषयाची उद्दिष्टे समोर ठेवून देण्यात आलेले आहे. यात शिक्षक आपल्या कल्पकतेने उद्दिष्टांनुसार बदल करू शकतात. प्रात्यक्षिक कार्यासाठी शिक्षकांनी विविध घटक व रंगसंवादांची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.

या विषयाची आवड वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांना या संदर्भातील पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, त्यातून त्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त नवनवीन चित्रे, शिल्प, वास्तू यांची माहिती मिळवण्यासाठी उद्युक्त करावे. विविध कलासंग्रहालयांत प्रत्यक्ष नेऊन चित्रे, शिल्पे दाखवावीत, प्रत्यक्ष वास्तू किंवा फोटो दाखवावे व त्याचे महत्व सांगावे. आपल्या जवळच्या एखाद्या प्रसिद्ध वास्तूस भेट देऊन त्याविषयीची अधिक माहिती त्यांना द्यावी. अनेक ठिकाणी कलाप्रदर्शने भरतात त्यांना भेटी देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे. या विषयासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच वृत्तपत्रे, मासिके यांत येणाऱ्या अद्ययावत तपशीलाची कात्रणे काढून त्यांचा कात्रण संग्रह करण्याविषयी मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्राकृतींचे प्रदर्शन भरवावे.

या विषयाचे परिपूर्ण ज्ञान देण्यासाठी स्वयंअध्ययन, विविध कौशल्ये, शैक्षणिक साधने यांचा वापर करून आपली अध्यापन पद्धती प्रभावीपणे राबवाल याची खात्री आहेच. पुस्तकातील सर्व घटक ज्ञानरचनावादी पद्धतीने शिकवणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रत्येक घटकानंतर काही स्वाध्याय व इतर उपक्रम देण्यात आले आहेत. कोणतेही प्रकरण शिकवण्याआधी त्यातील उपक्रमांचे नियोजन करावयाचे आहे. **पुस्तकात नमुन्यादाखल काही प्रात्यक्षिके दिली आहेत. आवश्यकतेप्रमाणे त्यात बदल करण्यास हरकत नाही.** विद्यार्थ्यांमध्ये उत्तम कलाकार किंवा व्यावसायिक कलाकार म्हणून आवश्यक कौशल्ये विकसित होतील या दृष्टीने आपणांकडून प्रयत्न होणे अपेक्षित आहे.

यापूर्वी कलेचा इतिहास व रसग्रहण या विषयाची शिक्षक हस्तपुस्तिका तयार करण्यात येत असे. परंतु यावर्षी प्रथमच 'कलेचा इतिहास व रसग्रहण' विषयाचे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. याचा उपयोग विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक व जिज्ञासू वाचकांना निश्चित होईल. या पुस्तकाचे लेखन संपादनात **श्री. राजेंद्र महाजन, श्री. दिपक जोगदंड आणि श्रीमती मेघा मानेकर** यांनी तसेच गुणवत्ता परीक्षण **श्रीमती हेमा धोत्रे** यांनी केले त्याबद्दल अभ्यासगट त्यांचे आभारी आहे.

**कलेचा इतिहास व रसग्रहण अभ्यासगट,**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

## विद्यार्थ्यांसाठी

कला हा विषय तुम्हांला परिचित आहेच. कलेचा इतिहास व रसग्रहण या विषयाच्या अभ्यासामुळे तुम्हांला अनेक नवनवीन गोष्टींचे ज्ञान मिळणार आहे. भारतीय तसेच पाश्चात्य कला, त्यांचा समृद्ध इतिहास किती मोठा आहे याची माहिती या विषयाद्‌वारे मिळणार आहे. येथे अगदी थोडासाच भाग आपल्याला अभ्यासण्यासाठी दिलेला आहे. या विषयाच्या अभ्यासामुळे तुमचा बौद्‌धिक तसेच कौशल्यात्मक विकास होईल अशाच कृतींचा आणि माहितीचा समावेश या विषयात केलेला आहे. यात गोडी निर्माण करण्यासाठी या विषयाची पुस्तके तसेच मासिकांत, वृत्तपत्रांत येणारे लेख वाचा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही अधिक माहिती तुम्हांला मिळू शकेल.

विविध कलासंग्रहालयांना जरूर भेटी द्या. तेथील प्राचीन शिल्पे, चित्रे, वास्तू नमुने पहा व अभ्यासा. शक्य असल्यास वेगवेगळ्या प्राचीन ठिकाणांना भेटी द्या. शैली, शिल्प, पाषाणाचा प्रकार, शिल्पे घडवण्याची पद्‌धत, शिल्पातून सांगितलेल्या कथा बारकाईने अभ्यासा. त्यांची चित्रे, फोटो आणि माहिती जमा करून कात्रणवही तयार करा.

प्रसिद्‌ध चित्रकारांची चित्रे अभ्यासा, रेखाटने, रंग देण्याच्या पद्‌धती, माध्यम यांसारख्या वैशिष्ट्यांचे निरीक्षण करा. चित्रांची प्रदर्शने भरतात त्यांना भेटी द्या. नावीन्यपूर्ण गोष्टी टिपून ठेवा. त्या आत्मसात करण्याचा प्रयत्न करा. कला ही शास्त्र व क्रियात्मक स्वरूपात विभागलेली असते. शास्त्राबरोबरच क्रियात्मक म्हणजेच प्रात्यक्षिक कार्यावरही भर देत असताना चित्रकला, संकल्पचित्र व चित्रात्मक संकल्प यांचा समावेश प्रात्यक्षिकांमध्ये केलेला आहे. प्रात्यक्षिकांचा सरावही तितकाच महत्त्वाचा घटक आहे. त्या दृष्टीने आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सराव करावा.

कलेचा समृद्‌ध ठेवा तुम्ही या विषयाद्‌वारे अभ्यासणार आहात. सौंदर्यदृष्टी, जिज्ञासूवृत्ती, कल्पकता, टापटीपपणा, नीटनेटकेपणा यांसारख्या इष्ट मूल्यांची जोपासना या विषयातून आपोआपच होणार आहे.

या विषयासंदर्भात आलेल्या अडचणी सोडवण्यासाठी आपले शिक्षक मदतीला आहेत. या विषयाचा अभ्यास तुम्ही आनंदाने कराल ही आशा आहे. या पुस्तकातील प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वाध्याय दिला आहे. स्वाध्याय कृतिपत्रिकेवर आधारीत तयार केला आहे. स्वमत, स्वत:च्या संकल्पना, संदर्भ ग्रंथ विचारात घेऊन स्वाध्याय सोडवणे आवश्यक आहे. तसेच सरावासाठी काही प्रश्नही दिलेले आहेत.

कलेचा इतिहास व रसग्रहण या पुस्तकाच्या माध्यमातून कला विषयाचा अभ्यास करण्यासाठी आपणांस शुभेच्छा!

**कलेचा इतिहास व रसग्रहण अभ्यासगट,**

पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

## कलेचा इतिहास व रसग्रहण क्षमता विधाने : इयत्ता बारावी

| अ.क्र. | क्षमता विधाने |
|---|---|
| १. | कलेच्या विकासातील टप्पे माहीत होणे. |
| २. | भारतीय मंदिररचनेचा विकास अभ्यासणे. |
| ३. | नागर, द्राविड, वेसर शैलींची वैशिष्ट्ये जाणून घेणे. |
| ४. | प्रसिद्ध मंदिरांची व इतर शिल्पांची माहिती घेणे. |
| ५. | मोगल शैली, पहाडी शैली यांचा अभ्यास करणे. |
| ६. | सामाजिक व धार्मिक कल्पना यांतून निर्माण झालेली कला अभ्यासणे. |
| ७. | प्रसिद्ध चित्रकार, शिल्पकार यांची माहिती घेणे. |
| ८. | पाश्चात्य वास्तुकलेची माहिती व वैशिष्ट्ये समजून घेणे. |
| ९. | मायकेल अँजेलो, लिओनार्दो-द-विंची या प्रसिद्ध कलाकारांविषयीची माहिती घेणे. |
| १०. | आधुनिक कलाप्रवाहाची वैशिष्ट्ये जाणून घेणे. |
| ११. | बर्निनी या वास्तुकाराविषयी माहिती घेणे. |
| १२. | पाश्चात्य वास्तुकलेतील, पिसाचा झुकता मनोरा या वास्तूंची वैशिष्ट्ये समजून घेणे. |
| १३. | हाजिया सोफिया या चर्चची वास्तुकलाविषयक वैशिष्ट्ये अभ्यासणे. |
| १४. | अतिवास्तववादी कलाप्रणालीची माहिती घेणे. |
| १५. | शिल्प, वास्तू व चित्र यांविषयीची माहिती अभ्यासणे. |
| | **प्रात्यक्षिक विषय (कोणताही एक विषय)**<br>चित्रकला (Drawing)<br>संकल्पचित्र व रंगकाम (Design and colour)<br>चित्रात्मक संकल्प (Pictorial Composition) |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकाचे नाव (सैद्धांतिक विभाग) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | (अ) सैध्दांतिक | |
| (१) | भाग १ भारतीय कला | |
| | १. भारतीय वास्तुकला | १ |
| | २. भारतीय शिल्पकला | ३० |
| | ३. भारतीय चित्रकला | ३९ |
| (२) | भाग २ पाश्चात्य कला | |
| | ४. पाश्चात्य वास्तुकला | ५७ |
| | ५. पाश्चात्य शिल्पकला | ६३ |
| | ६. पाश्चात्य चित्रकला | ६९ |
| (३) | भाग ३ कला शिक्षण | |
| | कला शिक्षणातील व्यवसायाच्या वाटा | ८० |
| | कला शिक्षणाच्या संधी | ८२ |
| (४) | (ब) प्रात्यक्षिक विषय (कोणताही एक विषय) | |
| | १. चित्रकला (Drawing) | ८४ |
| | २. संकल्पचित्र व रंगकाम (Design and Colour) | ८६ |
| | ३. चित्रात्मक संकल्प (Pictorial Composition) | ८८ |

# प्रात्यक्षिक विभाग

## १. चित्रकला (Drawing)

| अ. क्र. | घटक | उपघटक |
|---|---|---|
| १. | **चित्रकलेचे मूळ घटक** | (i) रेषा (ii) आकार (iii) रंग (iv) छायाभेद (v) पोत |
| २. | **रेखाटन** | रेखाटनाची माध्यमे<br>(i) पेन्सिल (ii) पेन (iii) स्केचपेन (iv) कलरब्रश<br>(v) संगणक (आधुनिक साधने) |
| ३. | **नैसर्गिक घटकांची रेखाटने** | पाने, फुले, फळे, पक्षी, प्राणी इत्यादी |
| ४. | **मानवनिर्मित घटकांची रेखाटने** | भांडी, घर, फर्निचर, वाहने इत्यादी |
| ५. | **भौमितिक घटकांची रेखाटने** | त्रिकोण, चौकोन, वर्तुळ इत्यादी |
| ६. | **निसर्गचित्र** | निसर्गातील रेखाटने |
| ७. | **वस्तुचित्र** | विविध वस्तुसमूहांचे रेखाटन |
| ८. | **सुलेखनाचे मूलभूत रेखाटन** | देवनागरी आणि रोमन |

## २. संकल्पचित्र व रंगकाम (Design and Colour)

| अ. क्र. | घटक | उपघटक |
|---|---|---|
| १. | **चित्रकलेचे मूळ घटक** | (i) रेषा (ii) आकार (iii) रंग (iv) छायाभेद (v) पोत |
| २. | **संकल्प** | (i) संकल्प म्हणजे काय ? (ii) संकल्पाचे प्रकार<br>(iii) संकल्पाची मूलतत्त्वे |
| ३. | **रंग व रंगसिद्धांत** | (i) रंगव्याख्या (ii) रंगज्ञान (iii) चित्रकारांचा रंगसिद्धांत (iv) रंगांची गुणवैशिष्ट्ये (v) रंगांचे प्रतीकात्मक अर्थ (vi) रंगमिश्रणे |

## ३. चित्रात्मक संकल्प (Pictorial Composition)

| अ. क्र. | घटक | उपघटक |
|---|---|---|
| १. | **चित्रकलेचे मूळ घटक** | (i) रेषा (ii) आकार (iii) रंग (iv) छायाभेद (v) पोत |
| २. | **संकल्पाची मूलतत्त्वे** | • पुनरावृत्ती • विरोध • लय • श्रेणीक्रम • प्रमाण<br>• संक्रमण • संवाद • विविधता • उत्सर्जन<br>• तोल • प्राधान्य • गौणत्व • एकता |
| ३. | **मुद्राचित्रण** | (i) नैसर्गिक पृष्ठभागावर केलेले मुद्रण (ii) उठाव मुद्रा मुद्रण<br>(iii) खोद मुद्रा मुद्रण |
| ४. | **लघुचित्र** | (i) भारतीय लघुचित्र शैलीची संकल्पना<br>(ii) लघुचित्र शैलीतील रचनाचित्रांची मांडणी, घटक व माध्यम<br>(iii) लघुचित्र शैलीतील घटकांची अभ्यास रेखाटने<br>(iv) लघुचित्र शैलीवर आधारित अभ्यास चित्रे |
| ५. | **रचनाचित्र – प्रकार** | (i) अलंकारिक रचना (ii) भौमितिक रचना<br>(iii) अमूर्त रचना (iv) जाहिरात चित्र |